**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३.</u>**

**<u>मी शपथेवर कथन करते की,</u>**

**नाव –** अनुराधा देवदास पाटील.

**वय** - ४१ वर्ष, **व्यवसाय** - महिला हेड कॉन्स्टेबल, २१६६,

**नेमणूक.-** उपविभागीय पोलिस अधिकारी, गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

**<u>सरकारतर्फे सरतपास– श्रीमती. एस. ए. म्हामूलकर, सरकारी वकील.</u>**

**१.** मी सन २०१९ पासून डी. वाय. एस. पी. कार्यालय, गडहिंग्लज येथे कार्यरत आहे. दि.०४.०६.२०२४ रोजी आमच्या वरिष्ठांना उत्तूर येथे अवैध दारु विक्रीचा व्यवसाय चालू असल्याबाबत मुख्य बातमीदाराकडून माहिती मिळाली होती. त्याप्रमाणे आम्ही खाजगी वाहनाने कारवाई करण्यासाठी उत्तूर येथे गेलो होतो. आम्ही तेथे भैरु कदम याच्या घरी भाडयाने राहणा–या आरोपीच्या घरामध्ये १८.३० वाजेच्या दरम्यान छापा मारला होता.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

**२.** त्या छाप्यामध्ये आम्हाला आरोपीच्या घरामध्ये मॅकडॉल, व्हीस्की, रॉयल स्टॅग, देशी दारु, आणि डॉ. ब्रॅन्डीच्या अशा ४६,०२४/– रुपयांच्या बाटल्या मिळाल्या होत्या. त्याबाबतचा तपासी अंमलदार बाजीराव कांबळे यांनी पंचनामा केला होता. त्यांनी त्याकामी जप्त बाटल्या सिलबंद करुन प्रत्येक नमुन्याची एक बाटली रासायनिक तपासणीसाठी वेगळी केली होती. त्यानंतर आम्ही आरोपी व मुद्देमाल ताब्यात घेऊन पोलिस ठाण्यात येऊन मी आरोपी विरोधात तक्रार दिली होती. आता मला ती तक्रार दाखवली, त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि. क्र. पी.–९** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपीतर्फे उलटतपास – श्री. एस. एस. इंजल वकील.</u>**

**३.** मी सन २०१९ पासून आजअखेर पर्यंत डी. वाय. एस. पी. कार्यालयात कार्यरत आहे. सदर गुन्हयाची गोपनीय बातमी आमच्या वरिष्ठांना मिळाली होती. आम्ही माहिती मिळाल्यानंतर छाप्यासाठी १८.०० वाजता गेलो होतो. आम्ही आमच्या स्वतःच्या दुचाकी घेऊन छाप्याकामी गेलो होतो. मला आरोपीच्या घराचा ग्रामपंचायत

क्रमांक व चतुःसिमा सांगता येणार नाही. पंचांना तपासी अंमलदारांनी बोलावले होते. माझ्यासोबत महिला शिपाई तेजस्विनी कळेकर, प्रशांत सुतार, श्रीकांत देसाई आले होते. मला पंच साक्षीदार हुले हा उत्तूर पोलिस चौकीचा सफाई कामगार असल्याची माहिती नाही. मला दुसरा पंच पोलिस पाटील असल्याची माहिती नाही. आम्हाला आरोपीच्या घरात मॅकडॉलच्या ९९ बाटल्या मिळाल्या होत्या. मी तक्रार देताना खाजगी वाहनाने घटनास्थळी गेल्याचे सांगितले नव्हते.

**४.** मी आरोपी भैरु कदमच्या घरी भाडयाने राहत असल्याचा कागदोपत्री पुरावा पाहिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही मी सरतपासात सांगितल्या प्रमाणे आरोपीच्या घरी कधीही छापा मारला नसून त्याच्या ताब्यातून कोणताही अवैध माल मिळाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कोणताही पंचनामा झाला नसून कोणताही मुद्देमाल जप्त केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही बेवारस मुद्देमाल आरोपीच्या नावे जप्त केल्याचे सांगून आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १६.०४.२०२५. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

**प्रमाणपत्र**

सदर साक्ष नोंदवण्यापूर्वी व्ही.सी. / दृकश्राव्य माध्यमाची तपासणी करण्यात आलेली असून चलचित्र व आवाज स्पष्टरित्या येत असल्याची साक्षीदार व सरकारी आणि आरोपीच्या वकिलांनी पृष्ठता केल्यामुळे पुरावा नोंदविण्यात आलेला आहे.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १६.०४.२०२५. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.